अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.६८/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/ ३३७७ दि. ०५/७/२०२४

माहितीचा अधिकार

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपील/६८/२०२४

Dr. Shahid Raza Burney
Chief Editor Aapla Saptah Newspaper
Magarpatta Road, Hadapsar,
Greater Pune-411013

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

Dr. Shahid Raza Burney, Chief Editor Aapla Saptah Newspaper, Hadapsar, Pune-13 (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२०/०६/२०२४ टपालाद्वारे (आ.क्र.४४७४ दि.२१/०६/२०२४) रोजी कार्यालयास प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/२९७१ दि.२५/६/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २०/०६/२०२४ ईमेलद्वारे | २१/०६/२०२४ | २०/०७/२०२४ | २५/०६/२०२४ | ० |

अपिलार्थी यांनी ईमेलद्वारे अपिल अर्ज दि.२४/६/२०२४ (आ.क्र.४५७६, दि.२५/०६/२०२४) दाखल केला आहे. अपिलामधील बाबी विवेचनमध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २४/०६/२०२४ (संध्या ५.१७ वा.) | २५/०६/२०२४ | २४/०७/२०२४ | होय | -- |

अपिल अर्जावर ४८ तासात सुनावणी घेण्याबाबत अपिलार्थी यांनी नमूद केले असल्याने दि.२६/६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. ऑनलाईन स्वरुपात सुनावणी आयोजित करण्यात आल्याचे जा.क्र.उआ(सा.प्र)/आस्था/२९७६, दि.२५/०६/२०२४ रोजीचे पत्राद्वारे कळविण्यात आले होते. सदर सुनावणी अपिल अधिकारी यांना दि.२६/६/२०२४ रोजी मा.महापालिका आयुक्त यांचेकडील व्ही.सी.साठी अचानक जावे लागल्याने सुनावणी रद्द करणेबाबत श्रीमती रेवती थिटे यांना कळविले आहे. त्याअनुषंगाने अपिलार्थी यांना दूरध्वनीद्वारे व ईमेलद्वारे कळविण्यात आले आहे. सुनावणी रद्द केल्याचे अनुषंगाने अपिलार्थी यांचे दोन ईमेल दि.२६/६/२०२४ रोजी प्राप्त झाले आहेत.

सदर अपिलाची सुनावणी दि.२६/६/२०२४ रोजी रद्द झाली. अपिलार्थी यांचे अपिल क्र.६६/२०२४ वर ऑनलाईन सुनावणी दि.२८/६/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्या अपिलामध्ये अग्निशमन विभागाच्याबाबत असलेल्या अपिलाचे अनुषंगाने चर्चा झाली. त्यातील विवेचनात नमूद करण्यात आले आहेत.

## विवेचन

अपिलार्थी यांनी अपिल अर्जामध्ये पुढील बाबी नमूद केल्या आहेत.

1) I am challenging and contesting the strange mockery of the General Admin PMC staff and PIO
2) My RTI Application hard copy was emailed on 20.6.2024 and also sent by Speed Post.
3) The query was only related to the General Administration not to Central Fire Brigade as it was a totally administrative query.
4) The RTI was thus not to be transferred to Fire Brigade, as Section 6 of RTI was not required as query was limited to same Public Authority.
5) Even if was to be transferred immediately, the Appellant was to be informed as per the RTI law immediately which was violated.
6) Thus technically and legally the PIO and the RTI staff in General Administration are guilty of violating the RTI Law for which they are responsible.
7) Hearing by Video Conferencing within 48 hours and Video recording to be protected and kept saved for evidence purposes before State information
8) Commission and High Court. And also the hearing to be noted and transcript by a Stenographer for SPEAKING ORDER.
9) I demand penalty under section 20(1) and 20(2) and compensation of Rs.1 lakh each Under Section 19(8)(b) to be recommended to State information Commissioner under RTI Act. The First Appellate Authority Can also be punished under Section 19(8)(c) of

RTI Act. Please Refer to Chief information Commissioner Circular of 25.6.2019. As per Chief information Commissioner orders, all PIOs and FAAs are to be available for the RTI Applicants during official working hours and responsible to attend to the Applicants queries.

मूळ माहिती अधिकार अर्जातील माहिती ही अग्निशमन दलाकडील प्रथम अपिल अधिकारी, जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांचे नियुक्तीशी निगडीत २ मुद्दांची माहिती विचारली आहे. अपिलार्थी यांना जा.क्र.जमाअ/आस्था/२९७१ दि.२५/६/२०२४ रोजी कळविण्यात आली आहे.

**<u>अपिल सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अपिलाशी निगडीत नमूद मुद्दे खालीलप्रमाणे:-</u>**

१) मी दोन अपील अर्ज दाखल केले होते. ते Pending आहेत. सुनावणी का घेतली नाही?

२) तुम्ही माझे अपील Last Moment ला reschedule केले. असे तुम्ही Last Moment ला अपील रद्द करू शकत नाही. माझ्याकडे मंत्रालयाचे Schedule असते. मी त्यांना थांबा म्हणायचं का?

३) Commissioner यांच्या पेक्षा Law महत्वाचा आहे. Law नुसार काम करणे अपेक्षित आहे.

४) तुम्ही मला माझ्या अपिलाचा Registration Number दिला नाही. तुमचा Inward No. आणि Outward No. दिसत नाही. माझ्याकडे Registration Number नाही.

५) तुम्ही मला २९७१ या जा.क्र. ने उत्तर पाठविले आहे. मी जे अपिलात लिहिलेले आहे त्यावर मी ठाम आहे.

६) Chief Fire Officer यांना अपिलीय अधिकारी आणि जन माहिती अधिकारी यांना नेमण्याचे अधिकार कोण दिले. Who is Superior? Commissioner or Law. So he cannot make this. दि.१.२.२०१७ चा GR आहे कि FAA आणि PIO कोण असू शकतो.

७) लिपिक हा जन माहिती अधिकारी म्हणून काम कसा करू शकतो? हा जोक आहे.

८) APIO is only to collect RTI Application and Appeals and to transfer it. APIO ची नेमणूक फक्त Sub Divisional Office च्या ठिकाणी करणे असे कायद्यात आहे.

९) G.R updated नाही. You are a public servant. You are not following law. तुम्ही माहिती बरोबर द्या. समजून घ्या. तुम्ही Deputy Commissioner आहात. तुम्ही RTI ची प्रस्तावना वाचली पाहिजे.

१०) You have no powers to punish anyone. You have no authority to take disciplinary action against anyone.

११) खरी माहिती द्या. दिशाभूल करणारी, खोटी माहिती देणे चुकीचे आहे.

१३) We don't want to punish anyone, we want to reform people. Section 4(1) ची माहिती updated हवी.

१४) Appeals are not transferable. तुमच्या dept. ने अपील IT ला forward केले.

१५) People are paying tax and you get salary.

१६) अपीलाबद्दल Bombay High court चे judgment आहे. Mr.Gokha, and Shinde, Bench forest dept., D.K. Deo

१७) कायद्यानुसार कार्य करणे. Do not make mockery of law. Law is supreme.

१८) आपल्याकडे कायदा आहे. शासनाचे G.R आहेत. यांच्यापेक्षा तुम्ही वर आहात का?

१९) तुम्ही दिलेल्या उत्तरामध्ये शेखर गायकवाड सरांचे सहीने जे पत्र आहे त्यानुसार लिपिक म्हणून जन माहिती अधिकारी नेमणे हि तर चेष्टा आहे.

सदर अपिलाचे अनुषंगाने उपरोक्त मुद्दयातील क्र.६ ते ८ व १९ संबंधित आहे.

**अपिल अधिकारी यांचे अपिलाशी संबंधित म्हणणे:-**

मा.महापालिका आयुक्त यांच्याकडील एक VC दि.२६/६/२०२४ होती, त्यामुळे त्या दिवशी अपील सुनावणी होऊ शकले नाही. त्यासाठी पुढील दिनांक देण्यासाठी मांगितले होते. तुम्हाला प्रथम अपील अधिकारी व जन माहिती अधिकारी यांची नियुक्तीबाबतचे महापालिका आयुक्त यांच्या सहीचे परिपत्रक देण्यात आले आहे. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी नेमणेबाबत खातेस्तरावर खातेप्रमुख यांना अधिकार देण्यात आले आहेत. याबाबत मा.महापालिका आयुक्त यांचेशी चर्चा करुन निर्णय घ्यावा लागेल. तुम्ही केलेल्या अपीलाचा Registration No., Inward No. व Outward No. तुम्हाला दिलेल्या पत्रामध्ये देण्यात आले आहे, असे अपिलाधिकारी यांनी अपील दरम्यान नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

## आदेश

१) जन माहिती आधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी दि.१४/१२/२०२१ चे कार्यालय परिपत्रकाचे अनुषंगाने उपलब्ध इतर अभिलेखे विनामूल्य १५ दिवसात देण्यात यावेत.

२) सहाय्यक जन माहिती अधिकारी यांचेबाबत अपिल क्र.६६/२०२४ चे अनुषंगाने काढण्यात येणाऱ्या कार्यालय परिपत्रकाची प्रत कार्यवाहीपूर्ण झाल्यावर उपलब्ध करुन देण्यात यावी.

सदर अपिल क्र.६८/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil
५-७-२४

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे. सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-

जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका.